# सुस्वागतम्

## जलयुक्त शिवार अभियान २०१९

## जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर

# जलयुक्त शिवार अभियानाचे उद्देश

१. पावसाचे जास्तीत जास्त पाणी गावाचे शिवारातच अडविणे.
२. भूगर्भातील पाण्याच्या पातळीत वाढ करणे.
३. राज्याच्या सिंचन क्षेत्रात वाढ करणे - शेती साठी संरंक्षित पाणी व पाण्याच्या वापराच्या कार्यक्षमतेत वाढ करणे.
४. राज्यातील सर्वांना पुरेशा प्रमाणात पाणी उपलब्ध करण्याची शाश्वता - ग्रामीण भागातील बंद पडलेल्या पाणी पुरवठा योजनांचे पुर्नर्जिवीकरण करून पाणी पुरवठ्यात वाढ करणे.
५. भूजल अधिनियम अंमलबजावणी.
६. विकेंद्रीत पाणी साठे निर्माण करणे.
७. पाणी साठवण क्षमता निर्माण करणारी नविन कामे हाती घेणे.
८. अस्तित्वात असलेले व निकामी झालेल्या जलस्त्रोतांची ( बंधारे/गाव तलाव/ पाझर तलाव/ सिमेंट बंधारे) पाणी साठवण क्षमता पुन:स्थापित करणे / वाढविणे.
९. अस्तित्वातील जलस्त्रोतांमधील गाऴ लोक सहभागातून काढून जलस्त्रोतांचा पाणीसाठा वाढविणे.
१०. वृक्ष लागवडीस प्रोत्साहन देऊन वृक्ष लागवड करणे.
११. पाण्याच्या ताळेबंदाबाबत जनतेत जाणीव / जागृती निर्माण करणे.
१२. शेतीसाठी पाण्याचा कार्यक्षम वापर करणेस प्रोत्साहन / जनजागृती करणे.
१३. पाणी अडविणे / जिरविणे बाबत लोकांना प्रोत्साहित (Sensitize) करणे / लाकसहभाग वाढविणे.

# अभियानाची व्याप्ती

- शासकीय विभाग
- स्वयंसेवी संस्था
- लोक सहभाग
- खाजगी उद्योजक

# गाव निवडीचे निकष

- सन २०१४-१५ मध्ये भूजल पातळी २ मीटर पेक्षा कमी व ज्या गावांमध्ये टंचाई परिस्थिती आहे.
- सतत ३ वर्षांपासून टॅंकरग्रस्त गावे.
- IWMP आंतर्गत निवडलेली गावे
- साखळी बंधारे कार्यक्रमांतर्गत निवडलेली गावे
- कोरडवाहू शेती अभियान अंतर्गत निवडलेली गावे

# अभियानाचा कालावधी

- अभियानांर्गत नियोजित कामे पावसाळ्यापुर्वी पुर्ण होतील अशी कार्यवाही करणे आवश्यक असल्याने डिसेंबर अखेर कृती आराखडा तयार करण्यात यावा.
- त्यास विभागीय समितीची मान्यता घेऊन जानेवारी च्या पहिल्या आठवड्यात प्रत्येक तालुक्यातून किमान ५ कामे सुरु करावीत.
- या कार्यक्रमाची प्रत्यक्ष अंमलबजावणी जानेवारी २०१५ ते जानेवारी २०१६ पर्येंत करण्यात यावी.
- जानेवारी २०१६ ते मार्च २०१६ या कालावधीत मुल्यमापनाचे काम करण्यात यावे.

# अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरीय समिती

| | | |
|---|---|---|
| ❖ जिल्हाधिकारी | - | अध्यक्ष |
| ❖ मुख्य कार्यकारी अधिकारी | - | सह अध्यक्ष |
| ❖ अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी | - | सदस्य |
| ❖ वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा | - | सदस्य |
| ❖ कार्यकारी अभियंता , जलसंपदा विभाग | - | सदस्य |
| ❖ कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग (जि.प) | - | सदस्य |
| ❖ कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग (ज.सं.) | - | सदस्य |
| ❖ उप विभागीय अधिकारी (प्रांत) | - | सदस्य |
| ❖ तज्ञ व्यक्ति (जलसंधारण ) – (१) | - | सदस्य |
| ❖ अशासकीय संस्थेचे प्रतिनिधी – (२) | - | सदस्य |
| ❖ जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | - | सदस्य सचिव |

# अभियानाचा आराखडा तयार करणे

- जलयुक्त शिवार अभियान राबविणेसाठी जिल्ह्यानिहाय आराखडा तयार करणे आवश्यक आहे.

- सदरचा आराखडा तयार करतांना शासनाच्या विविध याजनांतर्गत उपलब्ध होणारा निधी, मनरेगा निधी, स्वयंसेवी संस्थांचा सहभाग, सहकारी संस्था आणि लोकसहभाग यांचा विचार करणेत यावा.

- अभियानांतर्गत हाती घ्यावयाच्या कामांचा आराखडा तयार करतांना जिल्ह्यामध्ये
  १) अस्तित्वात असलेली जलसंधारणाची कामे प्राधान्याने पुर्ण करणे.
  २) नव्याने हाती घ्यावयाची कामे,
  ३) अस्तित्वात असलेल्या कामांची दुरूस्ती आणि जलस्त्रोतातील गाळ काढणे या कामांचे उद्दीष्ट व त्यासाठी आवश्यक निधी हे निश्चित करावे. गाव/ तालुका/ जिल्हा यांचा आराखडा तयार करण्याबाबतचा नमुना परिशिष्ट क मध्ये दिला आहे. त्यानुसार आराखडे तयार करावेत.

# अभियानाचा आराखडा तयार करणे

- ❖ सदरचा आराखडा तयार करण्यासाठी महसूल व कृषि अधिकारी यांनी सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, प्रगतशील शेतकरी यांच्यासोबत शिवार भेट करून गावाच्या गरजा विचारात घेऊन आराखडा तयार करावा.
- ❖ तालुक्यातील व जिल्ह्यातील गावांचे आराखडे एकत्रित करून तालुका व जिल्हा आराखडा तयार करावा.
- ❖ जलयुक्त शिवार अभियान आराखडा तयार करतांना जिल्हास्तरीय सर्व संबंधित यंत्रणांचा सहभाग आवश्यक राहील.

# अभियानाची अंमलबजावणी करण्यासाठी नोडल अधिकारी

- जलयुक्त शिवार अभियानाचा आराखडा तयार करणे, प्रभावी अंमलबजावणी, समन्वय व सनियंत्रणासाठी
  उप विभागीय अधिकारी (प्रांत)
  हे नोडल अधिकारी म्हणून काम पाहतील.

# तांत्रिक व प्रशासकीय मान्यता

- या कार्यक्रमांतर्गत समाविष्ट करण्यात आलेल्या संबंधित योजनांतच्या मार्गदर्शक सुचनांनूसार तांत्रिक व प्रशासकीय मान्यता संबंधित सक्षम प्राधिका-याकडून घ्याव्यात.